दै. एकमत दि. 27.02.25

# हरवलेले १५७ अँण्ड्रॉईड मोबाईल हस्तगत

## सायबर शाखेची कामगिरी



**नांदेड : प्रतिनिधी**

जिल्हयातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून मिसींग अर्थात हरवलेले १५७ महागडे अँड्रॉईड मोबाईल सायबर सेल, स्था.गु.शा. व नांदेड जिल्हयातील पोलिस ठाण्यातील संयुक्त पथकाने हस्तगत केले. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या उपस्थितील अनेक मुळ मालकांना मोबाईल परत देण्यात आले.

नांदेड येथील सायबल सेल, पोलिस ठाणे व स्थागुशाच्या संयुक्त पथकाने जिल्हयातील महाळ झालेल्या अँड्रॉईड मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी घेतला. या मोहिमेस यश आले असून पथकाने २४ लाख ८१५०० रूपयांचे १५७ मोबाईल रूपयाचे हस्तगत केले. हे मोबाईल एकत्रितरीत्या पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शोध झालेल्या मोबाईलचे आयएमईआय क्रमांकाची माहिती नांदेड पोलीस या फेसबुक पेज व टयुटरवर टाकण्यात आली आहे. त्यापैकी नागरीकांनी आपल्या हरवलेल्या अँड्रॉईड मोबाईलचा आयएमईआय क्रमांक ओळखुन सायबर पो.स्टे. नांदेड येथून मोबाईल घेवून जावेत असे आवाहन करण्यात येत आहे. सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराय धरणे, गृह पोलिस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, पोनि धिरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, पोउपनि एम.बी. चव्हाण, अमलदार राजेन्द्र सिटीकर, दिपक ओढणे, दाविद पिडगे, मोहम्मद असीफ, किशोर जैस्वाल, काशीनाथ कारखेडे, दिपक शेवाळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दिपक राठोड, मपोकॉ कांचन कसबे, शुभांगी जाधव यांनी पार पाडली आहे.